# डहाणू विधानसभा मतदारसंघ भाजपने कसा गमावला?


**संजीव जोशी**
**डहाणू । दि. २६**

डहाणूचे पराभूत आमदार पास्कल धनारे यांची पार्श्वभुमी पाहीली तर ते लाल बावट्यातून जडणघडण झाल्यानंतर भाजपमध्ये आले आणि चिंतामण वणगांचे विश्वासू कार्यकर्ते बनले. रेशनिंग दुकानदार आणि दारुच्या व्यवसायात स्थिरस्थावर झालेले होते. भाजपमधील तलासरी तालुक्यातील एक हुकमी कार्यकर्ता म्हणून ओळख निर्माण झाली. त्यांना मोदी लाटेत विधानसभा उमेदवारी मिळाली आणि निवडूनही आले. परंतु त्यांचे तलासरी तालुक्यात प्रतिकूल परिस्थितीत वनवासी कल्याण केंद्र चालवून वणगा, सवरांसारख्या ३/४ पिढ्या निर्माण करणाऱ्या विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांशी फारसे जमले नाही. मला सर्व कळते हा अविर्भाव आणि अहंकारी वृत्तीने ते लवकरच अप्रिय होऊ लागले. त्यांच्याकडे संघटन कौशल्य नसताना भाजपने त्यांना जिल्हाध्यक्ष केले. उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांकडून दारुच्या बाटल्यांची खंडणी गोळा करण्याच्या प्रयत्नातून व्हायरल झालेल्या ऑडिओ क्लिपमुळे ते बदनाम झाले. या प्रकरणाच्या चौकशीत काय तथ्य निघाले ते भाजपने शेवटपर्यंत दडवले. धनारे यांनी डहाणू नगरपरिषदेवर भ्रष्टाचाराचे आरोप केले. या आरोपांच्या चौकशीत कुठलेही तथ्य उघड करण्यात त्यांना व भाजपला अपयश आले. उलट तडजोडी केल्या. (पुढील माजकूर पान ७ वर)

## भाजपनेच भाजपला हरवले

## मतदारसंघाची पार्श्वभूमी :

- डहाणू विधानसभा मतदारसंघ हा १९७७ चा अपवाद वगळता काँग्रेस/राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला राहिलेला आहे. येथून १९६२ साली काँग्रेसचे शामराव पाटील हे बिगर आदिवासी आमदार निवडून आले होते. त्यानंतर हा मतदारसंघ अनुसूचित जमातीसाठी आरक्षित झाल्यामुळे १९६७ साली येथून काँग्रेसतर्फे महादेव उर्फ भाई कडू आमदार झाले. १९७२ साली भाई कडू पुन्हा निवडून आले. आणीबाणीनंतर आलेल्या काँग्रेस विरोधी लाटेमध्ये डहाणू मतदारसंघातून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे शंकर चव्हाण यांनी भाई कडूंचा पराभव करुन हा मतदारसंघ मिळवला.
- १९८० च्या निवडणूकीत मात्र भाई कडूंनी विजय मिळवून हा मतदारसंघ पुन्हा काँग्रेसकडे खेचून आणला. १९८५ मध्ये भाई कडूंच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे काँग्रेसने शंकर नम यांच्या रुपाने तरुण उमेदवाराला संधी दिली. शंकर नम या मतदारसंघातून १९८५, १९९०, १९९५ असे सलग ३ वेळा विजयी झाले. १९९३ मध्ये नम यांना उपमंत्रीपद व ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री होण्याची संधी मिळाली. शंकर नम यांनी १९९८ मध्ये डहाणू लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसतर्फे निवडणूक लढवली आणि १९९६ मध्ये भाजपच्या ताब्यात गेलेला लोकसभा मतदारसंघ पुन्हा मिळवला. डहाणू विधानसभा मतदारसंघाच्या रिक्त झालेल्या जागेवर १९९८ मध्ये झालेल्या पोटनिवडणुकीत काँग्रेसचे कृष्णा घोडा विजयी झाले. पुन्हा १९९९ च्या सार्वत्रिक निवडणूकीत काँग्रेसतर्फे कृष्णा घोडा यांना संधी मिळाली व ते विजयी झाले. या दरम्यान काँग्रेसमध्ये फुट पडली व कृष्णा घोडा हे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेले. २००४ मध्ये कृष्णा घोडा हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या तिकिटावर निवडून आले.
- २००९ मध्ये मतदारसंघाची फेररचना झाली. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा बालेकिल्ला असलेला तलासरी तालुका जव्हार मतदारसंघातून वगळून डहाणू विधानसभा मतदारसंघाला जोडण्यात आला आणि २००९ च्या निवडणूकीमध्ये हा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसने गमावला. कृष्णा घोडा यांना पराभूत करुन येथून मार्क्सवादी पक्षातर्फे राजाराम ओझरे विजयी झाले.
- २०१४ च्या सार्वत्रिक निवडणूकीत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षातर्फे राजाराम ओझरे यांना उमेदवारी नाकारण्यात आली. त्यांचे चिरंजीव सुधीर ओझरे यांनी बंडखोरी केली. काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे स्वतंत्र निवडणूक लढविण्यात आली. त्याच वेळी पंतप्रधान मोदी यांची लाट आलेली होती. या सर्वाचा फायदा घेत भाजपच्या पास्कल धनारे यांनी ४४ हजार ८४९ मते मिळवत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या बारक्या मांगात यांचा १६ हजार ७०० मतांनी पराभव केला. मांगात यांना २८ हजार १४९ मते मिळाली होती. माकपचे बंडखोर सुधीर ओझरे यांना १२ हजार ९६८ मते मिळाली होती. या मतदारसंघातून शिवसेनेतर्फे निवडणूक लढविणारे शंकर नम यांच्यासारख्या दिग्गज उमेदवाराला अवघी ७ हजार ८४७ मते मिळून त्यांचे डिपॉझीट जप्त झाले होते.



(पान ६ वरुन)

## डहाणू विधानसभा मतदारसंघ भाजपने कसा गमावला?



ज्या मुख्याधिकारी यांच्यावर आरोप केले त्या मुख्याधिकारी यांनाच शिफारसपत्र दिले. ज्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगराध्यक्षावर आरोप केले त्यांना भाजपमध्ये घेण्यासाठी लाल गालिचे अंथरले. पुढे नगरपरिषदेत भाजपची सत्ता आल्यानंतर ज्या प्रकरणात भ्रष्टाचाराचे आरोप केले त्याच प्रकरणात भाजपने स्वतःचे हात काळे केले. फोडाफोडी करुन पक्ष वाढवण्याचा प्रयत्न केला. त्यातून भाजपमध्ये अनेक गट आणि तट तयार झाले. एक ओरीजनल भाजपच्या कार्यकर्त्यांचा, भाजपमध्ये आयात होऊन वरचढ झालेले, आणि अलीकडे आयात झालेले असे विविध गट आणि उपगट तयार झाले. भाजप वाढत गेली पण ती सूज असल्याचे धनारेंच्या पराभवानंतरच लक्षात आले. डहाणूत भाजपचा चेहरा हायजॅक झालेला आहे.

अंतर्गत गटबाजीतून भाजपमध्ये काँग्रेस संस्कृती कशी रुळली ते कोणाला कळलेच नाही. त्यात पुन्हा विकासकामांच्या जोरावर मते न मागता राष्ट्रीय मुद्द्यांवर, ३७० कलम, मोदी व शहा यांच्या नावाने मते मागण्यात आली. भाजपचे स्टार प्रचारक विनोद तावडे यांच्या पत्रकार परिषदेला शिवसेनेचे संतोष शेट्टी, नव्याने भाजपमधून आलेले माजी नगराध्यक्ष मिहीर शहा, रविंद्र फाटक दिसले नाहीत. भाजपचे देखील केवळ भरत राजपूत यांचे निकटवर्ती कार्यकर्ते उपस्थित होते. भाजपच्या अन्य पदाधिकाऱ्यांना विनोद तावडे येणार असल्याची माहिती देखील नव्हती. मुख्यमंत्र्यांच्या सभेत देखील व्यासपीठावर बसणाऱ्यांच्या यादीतून संतोष शेट्टी यांना वगळण्यात आले होते. आयत्यावेळी त्यांचे नाव समाविष्ट करण्यात आले. मिहीर शहा व रविंद्र फाटक यांना यावेळी दुर्लक्षीत करण्यात आले.

विश्व हिंदू परिषदेशी नाळ आणि योगदान असणारे रमेश मलावकर यांची बंडखोरी भाजप आणि धनारेंनी गांभीर्याने घेतली नाही. नंतर मलावकर यांची बंडखोरी कायम राहून चिन्ह मिळाल्यानंतर त्यांची समजूत काढण्यात आली. परंतु तो पर्यंत नाराजी बऱ्यापैकी वाढली होती. मलावकर यांची वेगवेगळ्या गटांतर्फे समजूत काढून श्रेय लाटण्याचा प्रयत्न झाला. एक गट समजूत काढेल तर दुसरा गट फितवण्याचा प्रयत्न करित होता. शिवसेनेशी अपमानास्पद वर्तन करण्यात आले. भाजपच्या बूथ लेव्हल मॅनेजमेन्टचे सूत्र गुंडाळून ठेवण्यात आले आणि व्यक्तीकेंद्रीत मॅनेजमेन्ट करण्यात आली. आर्थिक रसद पुरविण्यात कार्यकर्त्यांमध्ये दुजाभाव करण्यात आला. प्रतिस्पर्धी गटाच्या बूथवर भाजपला कमी मतदान व्हावे व त्या कारणाने त्या गटाचा काटा काढण्याचे डावपेच लढविण्यात आले. भाजपला अनुकूल असलेल्या क्षेत्रात मतदानाचा टक्का घसरला. या सर्व अंतर्गत कलहातून या मतदारसंघात भाजपनेच भाजपला हरवले असे म्हणता येईल.